प्रकाश गोरे

# निसर्गाची पूर्वतयारी

पाषाणकडे जाणाऱ्या रस्त्यापासून काही अंतरावर एका टेकडीला उतार आहे. या ठिकाणी नेहमी मेंढ्यांची, शेळ्यांची चराई चालायची. झाडंझुडुपं माणसांकडून तोडली जायची, सरपणासाठी. दोन वर्षांपूर्वी ही जागा कुंपण घालून बंदिस्त केली गेली. त्यामुळे इतके दिवस चराई, तोड यांमुळे उजाड दिसणारा हा उतार निरनिराळ्या वनस्पतींनी आच्छादित गेला. यंदा पाऊस लांगला आल्याने इथे रानवळ एवढा फोफावला आहे की कंबरेपर्यंत माणूस आत बुडून जातो. निसर्गाचं पुनरुज्जीवन सुरू झालं!

उजाड माळावर हिरव्या वनस्पती उगवल्या की त्या सूर्याच्या ऊर्जेपासून अन्न तयार करण्याचं काम सुरू करतात. तयार झालेलं अन्न त्या स्वतःच्या वाढीसाठी वापरतात व मग इतरांच्या उपयोगासाठी ते राखून ठेवतात. अन्न तयार करण्यासाठी त्या जरी सूर्याची ऊर्जा वापरतात, तरी काही ऊर्जा त्यांच्या श्वसनांतून वातावरणात सोडली जाते. ही ऊर्जा उष्णता म्हणून बाहेर पडते आणि तिचा पुन्हा उपयोग होत नाही. एकप्रकारे ती वाया जाते. या वाया जाणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण जास्तीतजास्त कसे राहील, हे निसर्ग पहात असतो.

चराई, तोड थांबली, उतारावर भरपूर रानवळ उगवला म्हणजे असंख्य कीटकांना अन्न आणि आसरा निर्माण झाला. असंख्य कीटकांना जन्माला घालणं आणि जगविणं हे निसर्गाला अधिक फायद्याचं ठरतं, कारण त्यांच्या श्वसनातून फार थोडी ऊर्जा वाया जाते. त्यामुळे प्राण्यांच्या आधी कीटक उत्क्रांत झाले. मोठे प्राणी जन्माला घालणं आणि जगविणं नेहमीच खर्चिक ठरत कारण त्यांना अन्न म्हणून जास्त ऊर्जा लागते आणि श्वसनाद्वारे ते जास्त ऊर्जा वायाही घालवितात. उतारावर निसर्गाचं पुनरुज्जीवन असंच चालू राहिलं तर, रानवळावर असंख्य कीटक जगतील, त्यांना भक्ष्य म्हणून उपयोग करणारे चतुर, माशा असे कीटकही तिथे जगू लागतील. मात्र आजची रानवळ हिवाळ्यात सुकून जाईल, त्याच्यात मुरलेले अन्नांश सूक्ष्म कीटक जमिनीत मिसळून देतील. जमीन जास्त सुपीक होईल

JYOTI
PAGE NO. :
DATE / /

आणि पुढच्या पावसाळ्यात यांच्याबरोबर इतरही काही जास्त पौष्टिक वनस्पती - गवत उगवतील आणि लहान कीटकांबरोबर - कोळी, शंख, विंचू असे प्राणीही उतारावर जगू लागतील. जमि-नीची सुपीकता वाढली की मोठे कीटक जगविणं निसर्गाला शक्य होतं. म्हणजेच मोठे प्राणी जगविण्यासाठी जमिनीची सुपीकता कितीतरी वाढायला पाहिजे, त्यावर निरनिराळ्या वनस्पती, कीटक, ~~प्राणी~~ छोटे प्राणी जगायला हवेत, त्यांच्याकडून अन्नांश सतत जमिनीत मिसळला पाहिजे, हे आपल्या ध्यानात येतं.

मोठे प्राणी जगविण्यासाठी निसर्गाला अशा रीतीने खूप पूर्वतयारी करावी लागते, वेळही त्यासाठी जास्त लागतो. म्हणजेच मोठं जनावर जन्माला घालणं, जगविणं हे खूप खर्चिक असतं.

आज जगात शक्तिनं, बुद्धीनं सर्वात मोठा प्राणी आहे माणूस! माणूस जन्माला घालण्यापूर्वी निसर्गाने खूप पूर्वतयारी केली. असंख्य प्रकारच्या वनस्पती, कीटक, पक्षी, प्राणी जन्माला घातले आणि माणसाला नीट जगता येईल अशी व्यवस्था करून ठेवली. अशी सर्व प्रकारची विविधता असली म्हणजेच माणूस नीट जगू शकेल, हे निसर्गानं ठरवून दिलं.

माणूस मात्र आज ही विविधता नष्ट करू लागलाय. पृथ्वी-वरून कितीतरी कीटक, वनस्पती, पक्षी, प्राणी नष्ट होत आहेत. या विविधतेद्वारे निसर्गाने ऊर्जेचा केवढा मोठा साठा तयार करून ठेवला होता, कारण माणसासारखा प्राणी जगण्यासाठी खूप ऊर्जा वापरणार हे निसर्गाला ठाऊक होतं. ही विविधता नष्ट झाली की निसर्गाने पूर्वतयारी म्हणून निर्माण करून ठेवलेला ऊर्जेचा साठा संपणार, माणसाला जगणं कठीण होणार, जगण्या-साठी त्याला खूप धडपड करावी लागणार, जगणं खर्चिक होणार!

जगातल्या प्रगत राष्ट्रांनी नैसर्गिक विविधता नष्ट केल्याने तिथं जीवन खूप महाग आहे. जगण्यासाठी धडपड खूप करावी लागतीय. त्यामुळे त्यांची लोकसंख्या सतत कमी होतीय. आपल्याला

त्यांना जिवंत गिरवून जाळणार नाही. निसर्गाने केलेली पूर्वतयारी आपण वाया घालविणार नाही. आपण वनस्पती, कीटक, पक्षी, प्राणी सगळ्यांना वाचविणार आहोत, त्यांच्याबरोबर जगणार आहोत, आपलं जीवन आनंदी, सुखमय करणार आहोत, महागाईला पिटाळून लावणार आहोत।

टेकडीच्या उतारावर पसरलेली रानवळा पाहून म्हणूनच मला आनंद झालाय.